१९९१ च्या लोकसंख्येच्या आधारे निकषानुसार नवीन आरोग्य संस्थांना मंजूरी देण्याबाबतचे धोरण [सुधारित आराखड्यास मान्यता].

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र. पीएचसी-१०९४/७११९/प्र.क्र. १३/९५/आरोग्य-४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १ जानेवारी, १९९६.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र शासनाने इ.स. २००० पर्यंत सर्वांसाठी आरोग्य पुरविण्याचे ध्येय अंगिकारले असून आतापर्यंत १९८१ च्या लोकसंख्येच्या आधारावर शासनाने राज्यात ९७२५ उपकेंद्रे, १६७ प्रा.आ. पथके, ६२ फिरती आरोग्य पथके, १६९५ प्रा.आ. केंद्रे व २९५ ग्रामीण रुग्णालये [कुटीर रुग्णालयांसह] मंजूर केलेली आहेत. या संस्थांपैकी उपकेंद्रे, प्रा.आ. केंद्रे व ग्रामीण रुग्णालये केंद्र शासनाने विहित केलेल्या व राज्य शासनाने स्वीकारलेल्या निकषानुसार मंजूर करण्यात येतात. तथापि ती मंजूर करतांना आरोग्य सेवा सुविधा जनतेस जास्तीतजास्त मध्यवर्ती व इतर बाह्य सुविधा उपलब्ध असलेल्या ठिकाणी मंजूर करण्याच्या दृष्टीने काही विहित निकषाच्या आधारावर मंजूर करून या संस्थांच्या कार्यात सुसूत्रता आणणे व त्यानुसार १९९१ च्या लोकसंख्येच्या आधारावर निकषानुसार अतिरिक्त आरोग्य संस्था निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. तसेच अलिकडेच काही स्वयंसेवी संस्थांनीही अशा प्रकारच्या आरोग्य संस्था शासनाच्या मदतीने किंवा स्वत:च्या अर्थबळावर स्थापण्यास सहभाग दर्शविला आहे. या संस्थांचा सहभाग निश्चित करण्यास मंजूरी देण्यापूर्वी मंजूर करणे आवश्यक असलेल्या आरोग्य संस्थांचा संपूर्ण आराखडा निश्चित करणे आवश्यक आहे. म्हणजे ज्या ठिकाणी स्वयंसेवी संस्था आरोग्य संस्था स्थापण्यास उत्सुक असतील त्यांना आराखड्यात मंजूर केलेल्या संस्थांपैकी काही आरोग्य संस्था शासन व स्वयंसेवी संस्थांना आपापसात मान्य असलेल्या ठिकाणी स्थापण्यास परवानगी देता येणे शक्य होईल.

२. या सर्व बाबींचा विचार करून शासनाने १९९१ च्या लोकसंख्येच्या आधारावर आदिवासी, बिगर आदिवासी तसेच डोंगरी क्षेत्राच्या प्रचलित निकषावर मंजूर करण्याच्या संस्थांच्या संख्यात्मक आराखड्यास मंजूरी दिलेली असून त्यानुसार

[कृ. मा. प.]

12

राज्यात ९८ ग्रामीण रुग्णालय, ४१६ प्रा. आ. केंद्रे व २५३८ उपकेंद्रे निर्माण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तथापि आर्थिक बाबीचा विचार करता या संस्था एकदम मंजूर करता येणे शक्य नसल्यामुळे आरोग्य विभागास जिल्हा योजनांतर्गत येत्या काही वर्षांत उपलब्ध होणाऱ्या निधीच्या प्रमाणात त्या मंजूर करण्यात येणार आहेत. या आरोग्य संस्थापैकी मंजूर करण्यात येणाऱ्या ग्रामीण रुग्णालयांच्या बाबतीत ही रुग्णालये सध्या ज्या तालुक्यात मंजूर नाहीत त्या ठिकाणी मंजूर करण्यास प्राधान्य देण्यात येईल व त्यानंतर प्रा. आ. केंद्राच्या संख्येच्या संदर्भात ज्या तालुक्यात ग्रामीण रुग्णालयाचा अनुशेष असेल त्या तालुक्यातील इतर महत्वाच्या ठिकाणी ती स्थापण्याचा विचार करण्यात येईल. तसेच यापूर्वी ज्या काही प्रा. आ. केंद्राचे श्रेणीवर्धन करुन ग्रामीण रुग्णालये मंजूर करण्यात आली आहेत, त्या ठिकाणी अस्तित्वात असलेली प्रा. आ. केंद्रे इतरत्र हलविण्याच्या निरनिराळ्या स्तरावरुन आलेल्या मागण्यांचा विचार करुन शासनाने असा निर्णय घेतला आहे की, प्रा. आ. केंद्राचे श्रेणीवर्धन करुन ज्या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यात आले तेथील प्रा. आ. केंद्र वेगळे करुन ते १९९१ च्या लोकसंख्येनुसार प्रा. आ. केंद्राचा अनुशेष असल्यास त्या तालुक्यात व तालुक्यात अनुशेष नसल्यास त्या जिल्ह्यातील ज्या तालुक्यात प्रा. आ. केंद्राचा अनुशेष आहे तेथे मंजूर करावे. अशा प्रकारे मंजूर करावयाचे ठरलेल्या ९८ ग्रामीण रुग्णालये ४१६ प्रा. आ. केंद्रे व २५३८ उपकेंद्रे यांचा संख्यात्मक आराखडा या सोबत प्रपत्र "अ" मध्ये दर्शविलेला आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत तसेच डोंगरी क्षेत्रात मंजूर करावयाच्या आरोग्य संस्थांची संख्याही या प्रपत्रात दर्शविलेली आहे.

३. वर नमूद केल्याप्रमाणे या आरोग्य संस्था मंजूर करतांना लक्ष देणे आवश्यक असलेली सर्वात महत्वाची बाब म्हणजे या आरोग्य संस्था जनतेच्या सोयीच्या दृष्टीने मध्यवर्ती असे ठिकाण निश्चित करुन स्थापन करणे आवश्यक आहे. त्यासाठी ठिकाणे निश्चित करण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली मार्गदर्शक तत्वेही या निर्णयासोबत (प्रपत्र-ब) जोडण्यात आलेली आहेत. या मार्गदर्शक तत्वानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व संबंधित मंडळाचे आरोग्य उपसंचालक यांनी

आवश्यक तो प्रस्ताव जिल्हा नियोजन व विकास मंडळास सादर करावा व जिल्हा नियोजन व विकास मंडळाने ठिकाणे निश्चित करुन ती संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या सहमतीने/शिफारशीसह शासनाकडे पाठवावयाची आहेत. त्याबरोबरच मंजूर करावयाच्या आरोग्य संस्थाचा प्राधान्यक्रमही जिल्हा नियोजन व विकास मंडळाने ठरविणे आवश्यक आहे.

४. वरीलप्रमाणे प्राधान्यक्रम ठरल्यानुसार संबंधित जिल्हा विकास व नियोजन मंडळाने त्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद त्यांच्या वार्षिक योजनांत केल्यानंतरच या संस्था शासनाकडून मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्यामुळे संबंधित जिल्हा नियोजन व विकास मंडळाने आपापल्या जिल्ह्यात किती व कोणत्या संस्था प्राधान्याने मंजूर करावयाच्या आहेत हे निश्चित करुन त्यानंतर वार्षिक योजनात समावेश करुन आवश्यक ती तरतूदही करणे आवश्यक आहे.

५. वरीलप्रमाणे प्राधान्यक्रम व संस्थांची ठिकाणे निश्चित केल्यावर ग्रामीण रुग्णालयासारख्या काही संस्था स्वयंसेवी संस्थांकडून केंद्रशासन व राज्यशासन यांच्याकडून मिळणाऱ्या अनुदानाच्या आधारावर मंजूर करण्याचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास यापैकी ग्रामीण रुग्णालय किंवा तत्सम संस्था अशा संस्थांमार्फत स्थापन करण्यास परवानगी देण्याचा विचार केला जाईल.

६. मंजूर करण्यात यावयाच्या आरोग्य संस्थास [ग्रामीण रुग्णालये, प्रा. आ. केंद्रे व उपकेंद्रे] मंजूर करावयाच्या कर्मचाऱ्यांच्या प्रमाणकासही मान्यता देण्यात येत असून त्यानुसार प्रपत्र "क" मध्ये दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारीवर्ग मंजूर करण्यात येईल. तसेच प्रा. आ. केंद्रात जीप व ग्रामीण रुग्णालयांना रुग्णवाहिका व क्ष-किरण यंत्रेही मंजूर करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ज. मा. गुप्ता]
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति,
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
महालेखापाल [लेखा परीक्षा]/[लेखा अनुज्ञेयता] मुंबई/नागपूर.

....४..

14

सहसंचालक, आरोग्य सेवा [निविष्ठ] मुंबई.

सहसंचालक, आरोग्य सेवा [आ.] पुणे कुटुंब कल्याण

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, [मा. बा. सं. व शा. आ. पुणे.

आरोग्य सेवा उपसंचालक, प्रभारी सर्व आरोग्यमंडळे.

सर्व जिल्हा शल्यचिकित्सक

सर्व मु जिल्हा आरोग्य अधिकारी,

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी

सर्व जिल्हा अधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळ

नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

आरोग्य-८ कार्यासन, सा. }
अर्थसंकल्प कार्यासन, } सा. आ. वि. मंत्रालय, मुंबई.
आस्थापना कार्यासन }
निवड नस्ती, आरोग्य-४ }

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र: पीएचसी-१०९४/४९०७/प्र. १३/९५/आ. ७ दिनांक १ जानेवारी १९९६ च्या शासन निर्णयाचे सहपत्र.

"प्रपत्र "अ"

"१९९१ च्या लोकसंख्येच्या आधारावर निकषानुसार राज्यात मंजूर करावयाच्या आरोग्य संस्थांचा जिल्हानिहाय संख्यात्मक आराखडा.

[बृहत आराखडा]

क्र.	जिल्हा	ग्रामीण रुग्णालये: तालुका मुख्यालयी	ग्रामीण रुग्णालये: इतर गावी	प्राथमिक आरोग्य केंद्रे: नव्याने मंजूर करावयाची: आदिवासी	प्राथमिक आरोग्य केंद्रे: नव्याने मंजूर करावयाची: डोंगरी	प्राथमिक आरोग्य केंद्रे: नव्याने मंजूर करावयाची: बिगर आदिवासी	प्राथमिक आरोग्य केंद्रे: स्थलांतराने मंजूर करावयाची	प्राथमिक आरोग्य केंद्रे: एकूण	उपकेंद्रे: आदिवासी	उपकेंद्रे: डोंगरी	उपकेंद्रे: बिगर आदिवासी	उपकेंद्रे: एकूण
	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.	१२.	१३.
	ठाणे	२[१]	—	९	२	१	५[३]	१५[१२]	९९	१०	५	११४
	रायगड	४	१	—	१४	१	५[१]	२०[१]	—	१४१	१७	१५८
३.	रत्नागिरी	—	—	—	—	—	६	६	—	५४	—	५४
४.	नासिक	४[१]	२[१]	७	५	२	१३[६]	२७[१३]	५६	४२	४०	१३८
५.	धुळे	१	४[२]	६	५	१	७[५]	१९[११]	८६	५७	३४	१७७
६.	जळगांव	५	—	—	—	२	१०[१]	१२[१]	—	३	७६	७९
७.	अहमदनगर	५	१	१	५	९	११[२]	२६[३]	८	५८	९०	१५६
८.	पुणे	२	४[२]	२	२६	५	८	४१[२]	२	२४२	३५	२७९
९.	सोलापूर	२	—	—	—	१२	५	१७	—	—	१३१	१३१
१०.	सातारा	२	४	—	२३	४	७	३४	—	२६५	५४	३१९
११.	कोल्हापूर	४	१	—	२७	३	८	३८	—	२४२	४०	२८२
१२.	सांगली	—	१	—	—	२	५	७	—	२२	६७	८९
१३.	सिंधुदुर्ग	२	—	—	—	—	१	१	—	९	—	९
१४.	औरंगाबाद	१	१	—	४	५	५	१४	—	१८	५६	७४
०५.	बीड	३	—	—	३	५	५	१३	—	१३	४४	५७
६.	जालना	३	—	—	—	६	४	१०	—	—	५५	५५
१७.	परभणी	४	—	—	२	७	४	१३	—	१९	१८	३७
१८.	उस्मानाबाद	१	—	—	—	—	५	५	—	—	१२	१२
१९.	नांदेड	—	१	—	—	७	५	१२	—	—	३९	३९
२०.	लातूर	१	—	—	—	१	४	५	—	—	३३	३३
२१.	अकोला	५	—	—	—	४	५	९	—	१	६	७
२२.	अमरावती	२	—	—	—	—	६	६	—	—	३५	३५
२३.	यवतमाळ	४	—	४	—	३	६[२]	१३[६]	५०	१	१६	६७
२४.	बुलढाणा	७	—	—	—	४	४	८	—	१	३६	३७
२५.	नागपूर	३	—	१	—	६	४[२]२	११[३]	४	—	२०	२४
२६.	वर्धा	३	—	—	—	१	४	५	—	—	१	१
२७.	भंडारा	३	—	१	—	४	८[४]	१३[५]	१२	—	१२	२४
२८.	चंद्रपूर	२[२]	—	—	—	—	७[१]	७[१]	४१	—	१	४२
२९.	गडचिरोली	३[३]	—	—	—	—	९[९]	९[९]	९	—	—	९
एकूण		७८[७]	२०[५]	३१	११४	९५	१७६[३५]	४१६[६६]	३६७	११९८	९७३	२५३८[३६७]

टिप: कंसातील आकडे आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आहेत.

16

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक पीएचसी १०९४/४६५/४१९९/प्र.क्र.१३/९५/आ.४, दिनांक १.१.१९९६

चे सहपत्र.

प्रपत्र - ब

अ] ग्रामीण रुग्णालयाची ठिकाणे निश्चित करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे:-

१] ग्रामीण रुग्णालय मंजूर करताना ते दर ५ प्राथमिक आरोग्य केंद्रामागे १ या प्रमाणात मंजूर करण्यात यावे.

२] प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आधारावर एका तालुक्यात एक ग्रामीण रुग्णालय मंजूर करावे, हे ठरल्यावर तालुका मुख्यालयी ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्यास प्राधान्य देण्यात यावे.

३] तालुका मुख्यालयी ग्रामीण रुग्णालय मंजूर केल्यानंतरही तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संख्येनुसार ग्रामीण रुग्णालय स्थापनेचा अनुशेष असेल तर ते ग्रामीण रुग्णालय कमीतकमी १०,००० लोकसंख्या असलेल्या तालुक्यातील महत्वाच्या ठिकाणी वज्या ५ प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी संदर्भ रुग्णालय म्हणून याचा विचार करण्यात येत असेल त्याला ते मध्यवर्ती असावे.

४]हे ग्रामीण रुग्णालय शक्य तो गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी म्हणजे रस्ते, वीज, पाणी इत्यादी सुविधा उपलब्ध असलेल्या सोईच्या ठिकाणी असावे.

५]ग्रामीण रुग्णालय मंजूर करताना ते नवीन ठिकाण म्हणूनच मंजूर करावे[प्राथमिक आरोग्य केंद्र/नगर परिषद दवाखाने/ जिल्हा परिषद दवाखाने याचे श्रेणीवर्धन करुन नसावे]

६]तालुक्यात एकही ग्रामीण रुग्णालय मंजूर नसल्यास तालुक्यात जरी पाचपेक्षा कमी प्राथमिक आरोग्य केंद्रे असली तरी तालुका मुख्यालयी ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यात यावे.

७]तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संख्येच्या संदर्भात त्या तालुक्यात ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याचा अनुशेष नसूनही जर तालुक्याच्या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय नसेल तर त्या ठिकाणी अतिरिक्त ग्रामीण रुग्णालय खास बाब म्हणून मंजूर करण्यात यावे.

..२.

८] तालुका मुख्यालयी वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा रुग्णालय किंवा तत्सम संदर्भ रुग्णालय मंजूर असल्यास त्या तालुक्यासाठी ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यात येऊ नये.

९] नगरपालिका मुख्यालयी ग्रामीण रुग्णालय मंजूर करताना ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण होईपर्यन्त नगरपालिकेने ग्रामीण रुग्णालय सुरु करण्यासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी. इतर ठिकाणी ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करुन द्यावी.

१०] जी ग्रामीण रुग्णालये प्राथमिक आरोग्य केंद्राची श्रेणीवाढ करुन मंजूर करण्यात आली आहेत, त्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे ही नष्ट झालेली आहेत, असे समजण्यात यावे व नष्ट केल्यानंतर जर त्या तालुक्यात किंवा जिल्ह्यात लोकसंख्येच्या आधारास अनुसरुन प्राथमिक आरोग्य केंद्राचा अनुशेष असल्यास नविन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात यावे. ही कार्यवाही एकाचवेळी करण्यात यावी, जेणेकरुन प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या कमी होणार नाही.

११] ग्रामीण रुग्णालयाच्या स्थापनेची जागा शक्यतो मोफत मिळविण्यात यावी व तशी ती मध्यवर्ती ठिकाणी उपलब्ध होत नसल्यास व जिल्हा नियोजन विकास मंडळाने तसा ठराव मंजूर केल्यास ती ग्रामीण रुग्णालयाची जागा शासनाच्या विहित पध्दतीने अधिग्रहीत करण्यात यावी.

ब] <u>प्राथमिक आरोग्य केंद्राची ठिकाणे निश्चित करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे.</u>

१] प्राथमिक आरोग्य केंद्रे आदिवासी भागामध्ये २०,००० लोकसंख्येसाठी १, डोंगराळ भागात २०,००० लोकसंख्येत १ व बिगर आदिवासी आणि बिगर डोंगराळ भागात ३०,००० लोकसंख्येत १ या प्रमाणात मंजूर करण्यात यावी.

२] प्राथमिक आरोग्य केंद्राचे ठिकाण निश्चित करताना त्या गावची लोकसंख्या आदिवासी/डोंगराळ भागात किमान शक्यतो २,००० असावी. बिगर आदिवासी व बिगर

...३

18

डोंगराळ भागात तो शक्यतो ५,००० असावी.

३) प्राथमिक आरोग्य केंद्र ज्या गावात स्थापन करण्यात येईल ते ठिकाण त्या प्राथमिक आरोग्य केंद्रात संलग्न असलेल्या उपकेंद्रांना सर्वसाधारणपणे मध्यवर्ती असावे.

४) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्थापनेची जागा शक्यतो मोफत मिळविण्यात यावी. मध्यवर्ती जागा उपलब्ध होत नसल्यास व जिल्हा परिषदेने तसा ठराव मंजूर केल्यास प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा शासनाच्या विहित पध्दतीने अधिग्रहीत करावी.

५) प्राथमिक आरोग्य केंद्र शक्यतो गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी म्हणजे रस्ते, वीज, पाणी व इतर जनतेला उपलब्ध असलेल्या सोईच्या ठिकाणी असावे.

क) <u>उपकेंद्राची ठिकाणे निश्चित करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे</u> :-

१) उपकेंद्र मंजूर करतांना तेथे आदिवासी व डोंगराळ भागात ३,००० लोकसंख्येच्या मागे १, बिगर आदिवासी व बिगर डोंगराळ भागास ५,००० लोकसंख्येसाठी १ या प्रमाणात मंजूर करण्यात यावी.

२) उपकेंद्राची ठिकाणे ठरवितांना ते आदिवासी व डोंगराळ विभागास ज्या गावांची किमान लोकसंख्या ५०० असेल त्या गावात व बिगर आदिवासी आणि डोंगराळ भागात ज्या गावची लोकसंख्या किमान १००० असेल अशा ठिकाणी मंजूर करण्यात यावी.

३) ही उपकेंद्रे सर्वसाधारणपणे गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी रस्ते, वीज व पाणी या सुविधा असलेल्या ठिकाणी असावी.

४) उपकेंद्राच्या स्थापनेची जागा शक्यतो मोफत मिळविण्यात यावी व तशी जागा मध्यवर्ती ठिकाणी उपलब्ध होत नसल्यास जिल्हा परिषदेने ठराव मंजूर केल्यास उपकेंद्राची जागा शासनाच्या विहित पध्दतीने अधिग्रहीत करण्यात यावी.

५) उपकेंद्र ज्या गावात स्थापन करण्यांत येईल ते गांव उपकेंद्रांतर्गत येणा-या गावांना मध्यवर्ती ठिकाणी असावे.

-x-

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. पीएचसी १०९४/४१९९/
प्र.क्र. १३/९५/आ-४, दिनांक १.१.१९९६ चे सहपत्र.

प्रपत्र क

ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध

ग्रामीण रुग्णालये.

अनुक्रमांक	पदाचे नांव	मंजूर पदे.
	तांत्रिक पदे.	
१]	वैद्यकीय अधिक्षक, वर्ग१	१
२]	वैद्यकीय अधिकारी, वर्ग२	३
३]	परिसेविका	१
४]	अधिपरिचारिका	७
५]	क्ष-किरण तंत्रज्ञ	१
६]	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	१
७]	फार्मासिस्ट	२
	अतांत्रिक पदे.	
८]	कारभारी	१
९]	कनिष्ठ लिपिक	१
१०]	लिपिक-टंकलेखक	२
११]	प्रयोगशाळा सहाय्यक	१
१२]	वाहन चालक	१
१३]	स्वयंपाकी	१
१४]	पहारेकरी	१
१५]	कक्षसेवक	४
१६]	शिपाई	१
१७]	सफाईगार	३
	एकूण.	३२

प्राथमिक आरोग्य केंद्र.

अ.क्र.	पदाचे नांव	बिगर आदिवासी क्षेत्रासाठी मंजूर पदे.	आदिवासी क्षेत्रासाठी मंजूर पदे.
१	२	३	४
तांत्रिक पदे.			
१.	वैद्यकीय अधिकारी, वर्ग२	२	१
२.	वैद्यकीय अधिकारी, वर्ग३	--	१
३.	आरोग्य सहाय्यक[पुरुष]	१	१
४.	आरोग्य सहाय्यक[स्त्री]एन. एम.	१	१
५.	स्त्री आरोग्य कर्मचारी[ए. एन. एम.]	१	१
६.	मिश्रक	१	१
अतांत्रिक पदे.			
७.	कनिष्ठ लिपिक	१	१
८.	वाहन चालक	१	१
९.	सफाईगार.	१	१
१०.	स्त्री परिचर	१	१
११.	पुरुष परिचर	३	३
	एकुण	१३	१३

उपकेंद्र.

अ.क्र.	पदाचे नांव	मंजूर पदे	पदाची श्रेणी.
१	२	३	४
१]	स्त्री आरोग्य कर्मचारी[ए. एन. एम.]	१	वर्ग ३
२]	पुरुष आरोग्य कर्मचारी[एम. पी. डब्ल्यु]	१	वर्ग ३
३]	अंशकालीन स्त्री परिचर	१	[illegible]
	एकुण	३	

आरोग्य संस्था स्थापन करण्यासाठी केंद्र सरकारचे लोकसंख्येचे निकष :-

केंद्र सरकारने ग्रामीण जनतेस आरोग्य सेवा पुरविण्यासाठी उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालय यांची त्रिस्तरीय संरचना मंजूर केली आहे. त्यांच्या स्थापनेचे केंद्र सरकारचे खालीलप्रमाणे लोकसंख्येचे निकष घालून दिलेले आहेत.

क्रम	संस्था	लोकसंख्येचे निकष	
		बिगर आदिवासी उपयोजना क्षेत्र	आदिवासी उपयोजना क्षेत्र व डोंगरी क्षेत्र
१	उपकेंद्र	५०००	३०००
२	प्राथमिक आरोग्य केंद्र	३००००	२००००

सन २००१ च्या लोकसंख्येनुसार आधारीत बृहत आराखडा :-

सन २००१ च्या जनगणनेनुसारची लोकसंख्या, गावापासून आरोग्य संस्थेचे अंतर (उपकेंद्र ६ कि.मी. व प्रा. आ.केंद्र २५ कि.मी.) वाढीव मनुष्यबळ व इतर तद्नुषंगिक निकषावर आधारीत आरोग्य संस्था स्थापन करण्याबाबत तसेच अतिरिक्त मनुष्यबळ पुरविण्याबाबतच्या बृहत आराखडयास शासनाने सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१२/ प्रक्र.१४१/ आरोग्य-३, दि.१७.०१.२०१३ व शासन निर्णय क्र.-२०१२/ प्र.क्र. ४०२/ आरोग्य-३, दि. ०९ जून, २०१४ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार राज्यात खालीलप्रमाणे नवीन आरोग्य संस्था स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

अ.क्र.	आरोग्य संस्थेचे नाव	मंजूर आरोग्य संस्थांची संख्या
१	प्राथमिक आरोग्य केंद्र	२७३
३	उपकेंद्र	९११

परंतू बृहत आराखडा तयार करताना राज्यातील काही प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांच्या नावाची पुनरावर्ती झाल्याने शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण २०१४/प्रक्र.२९९/आरोग्य-३ दि.१५.०१.२०१८ अन्वये काही आरोग्य संस्थांची नावे रद्द करण्यात आली आहेत. त्यानुसार नवनिर्मीत आरोग्य संस्थाची सुधारित स्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	आरोग्य संस्थेचे नाव	मंजूर आरोग्य संस्थांची संख्या
१	प्राथमिक आरोग्य केंद्र	२७१
३	उपकेंद्र	९०१

प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र या ठिकाणी खालील प्रमाणे अतिरिक्त मनुष्यबळ मंजूर करण्यात आले आहे:-

अ.क्र.	पद	प्राथमिक आरोग्य केंद्र	उपकेंद्र	एकूण
१	वैद्यकीय अधिकारी	२१०	-	२१०
२	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	९१	-	९१
३	आरोग्य सेविका (स्त्री)	१०७२	३५७९	४६५१
४	आरोग्य सेवक (पु)	—	३०५८	३०५८
			एकूण	८०१०

शासनाने दि.१८.०१.२०१६ च्या पत्रान्वये ही पदे भरण्यास परवानगी दिली आहे. सदर शासन पत्र या कार्यालयाच्या दि.०८.०३.२०१६ च्या पत्रान्वये सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे.

२५

सन २०११ च्या लोकसंख्येनुसार आधारीत जोड बृहत आराखडा

सन २०११ च्या लोकसंख्येनुसार नविन जोड बृहत आराखडा तयार करावयाचे काम प्रगतीपथावर सुरु आहे. त्यासाठी नेमलेल्या समितीने खालीलप्रमाणे लोकसंख्या व अंतराचे निकष निश्चित केले आहेत.

क्रम	संस्था	लोकसंख्येचे निकष	
		बिगर आदिवासी उपयोजना क्षेत्र	आदिवासी उपयोजना, नक्षलग्रस्त व डोंगरी क्षेत्र
१	उपकेंद्र	५०००	३०००
२	प्राथमिक आरोग्य केंद्र	३००००	२००००

क्रम	संस्था	अंतराचे निकष (किमी)	
		बिगर आदिवासी उपयोजना क्षेत्र	आदिवासी उपयोजना, नक्षलग्रस्त व डोंगरी क्षेत्र
१	उपकेंद्र	६	४
२	प्राथमिक आरोग्य केंद्र	२५	१५

या संचालनालयाचे पत्र दि.१७.०३.२०१७ व दि.१९.०९.२०१७ अन्वये आरोग्य संस्था स्थापनेसाठी सुधारित निकष निर्गमीत करण्यात आले आहेत. त्यानुसार नवीन आरोग्य संस्था स्थापनेबाबत काही जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या कार्यालयाकडून विवरणपत्रामध्ये निकषात बसणा-या आरोग्य संस्थांची माहिती पाठविण्यात आली आहे. परंतू सदर प्रस्ताव चेकलिस्टनुसार परिपूर्ण नसल्यामुळे नविन निर्माण करण्याच्या आरोग्य संस्थांची चेकलिस्टनुसार परिपूर्ण माहिती आरोग्य समिती/जी.बी/डी.पी.डी.सी हे सर्व ठराव, आरोग्य संस्थेच्या कार्यक्षेत्राचा नकाशा इत्यादी बाबींची पूर्तता करुन प्रस्ताव उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळ यांच्यामार्फत सादर करण्याबाबत या संचालनालयाचे पत्र दि.१३.०३.२०१८ अन्वये जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. उपसंचालक परिमंडळे यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त होताच सदर प्रस्तावांची संचालनालय स्तरावरुन छाननी करुन २०११ च्या लोकसंख्येनुसार वाढीव नवीन आरोग्य संस्था मंजूरीचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात येतील.